साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपस्सना

साधक (मराठी)

**बुद्धवर्ष 2567, चैत्र पौर्णिमा, 23 एप्रिल, 2024 वर्ष 8 अंक 1**

**वार्षिक शुल्क** रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

## धम्मवाणी

**करणीयमत्थकुसलेन, यं तं सन्तं पदं अभिसमेच्च।**
**सक्को उजू च सुहुजू च, सुवचो चस्स मुदु अनतिमानी॥**

*— खु.नि., सुत्तनिपातपाळि, 8/143 मेत्तसुत्तं*

ज्याला खरोखरच आपला अर्थ सिद्ध करायचा आहे (आपले कल्याण साधायचे आहे), परम शांतीपद (निर्वाण) प्राप्त करायचे आहे, त्याला पाहिजे की तो यासाठी योग्य बनेल! तो सरळ होवो, अति-सरळ होवो, सुभाषी होवो, मृदू (स्वभावाचा) होवो, निराभिमानी होवो.

## जन्म-शताब्दी समापन समारोह कार्यक्रमातील विचार-मंथन आणि संकल्प

**क्रमशः भाग दुसरा–**

### रविवार, 4 फेब्रुवारी 2024

आजचा हा विशेष कार्यक्रम पूज्य गुरुजींच्या धर्म-कार्यांवर एक नजर टाकण्याबरोबरच विभिन्न क्षेत्रांमध्ये पुढे काय काम करायचे आहे– त्यालाही पाहण्या-समजण्यासाठी आहे. तदर्थाने आपले कर्तव्य आहे की भगवान बुद्धांपासून चालत आलेल्या गुरु-शिष्य परंपरेने बुद्ध शासनाला सुरक्षित ठेवण्यासाठी, त्याला दीर्घायु बनविण्यासाठी, त्यापासून स्वत: लाभान्वित होण्यासाठी तसेच लोकांची सेवा करण्यासाठी ज्या प्रकारे काम केले, आपणही तशाच प्रकारे धर्म-सेवा करीत राहू. बुद्ध शासनाला दीर्घकाळापर्यंत सुरक्षित ठेवण्यासाठी या पाच गोष्टींवर लक्ष द्यावे लागते– अधिगम अर्थात साधकांचे धर्म-पथावर पूर्णपणे प्रतिष्ठित होणे (मार्ग-फळ प्राप्तीपर्यंत), **पटिपत्ति**- विपश्यनेचा निरंतर अभ्यास करीत राहणे. **परियत्ति–** अर्थात भगवान बुद्धांच्या उपदेशांचे अध्ययन करीत राहणे. भगवानांच्या शिकवणीशी जोडलेल्या प्रतीकांचे– जसे विहार, साधना केंद्र, भिक्षू इत्यादींचे असणे. **धातु–** अर्थात भगवानांचे शरीरधातु सुरक्षित राहणे/ठेवणे.

जेव्हा सयाजी ऊ बा खिन यांनी पूज्य गुरुजी श्री सत्यनारायण गोयंकाजींना पूर्ण आचार्य बनवून भारतात विपश्यना शिकविण्याचे काम सोपविले तेव्हा गुरुजींनी आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार, आपल्या प्रज्ञा-पारमीनुसार एक-एक करून सर्व क्षेत्रांमध्ये धर्मकार्य चालू ठेवले. अधिगम तर साधकाची शुद्ध साधना, धर्माची समज आणि त्याच्या पारमितांवर निर्भर करते. म्हणूनच भगवानांनी म्हटले, **"कालं आगमेय्य"–** वेळ येऊ द्या. परंतु त्यासाठी परियत्ति आणि पटिपत्तिचे शुद्ध स्वरूपात कायम राहणेही आवश्यक आहे. तेव्हा आधी तर गुरुजींनी विपश्यना साधनेचा शुद्ध विधी लोकांना वाटला, हळूहळू साधक आणि धर्म-सेवक मोठ्या संख्येने त्यात जोडले गेले आणि धर्माच्या शुद्ध वातावरणाच्या स्थापनेकरीता केंद्रांचे निर्माण-कार्यही होऊ लागले.

**याला पूज्य गुरुजींच्याच शब्दांमध्ये समजून घेऊ**

"साधारणपणे २० वर्षांपूर्वी माझे धर्म-पिता सयाजी ऊ बा खिन यांनी एक खूप मोठी जबाबदारी माझ्या खांद्यांवर टाकली. या दीर्घ धर्मचारिकेचे जेव्हा सिंहावलोकन करतो म्हणजे जेव्हा मागे वळून पाहतो तेव्हा आश्चर्य वाटते की हे सर्व कसे झाले? नंतर गोष्ट लक्षात येते की खरोखर काम तर धर्मच करत असतो. व्यक्तीची काय महानता आहे? माझ्यासारखा व्यक्ती ज्याला करोड़ोंची संख्या असणाऱ्या या देशात काही मोजकेच लोक ओळखत असतील, तरीही कशा प्रकारे लोकांचा सहयोग मिळत गेला. सर्वात मोठा सहयोग तर परिवारातील लोकांचाच मिळाला. त्यांचा सहयोग मिळाला नसता तर धर्म-पित्याची हजार धर्मकामना असूनही साहस करूच शकलो नसतो की इतके मोठे काम सुरू करेन. परंतु जसे काम सुरू झाले तेव्हा पाहिले की कशा प्रकारे ओळख असलेले, नसलेले लोक खेचल्यासारखे येत आहेत. केवळ शिबिरांमध्ये भाग घेण्यासाठीच नाही तर हर प्रकारे सहायता करण्यासाठी देखील. आणि त्या दिवसांतील शिबिरे– जेव्हा की साऱ्या सुविधा बिचाऱ्या व्यवस्थापकाला किती अडचणींमधून जुळवाव्या लागत होत्या– कधी कोणते भाड्याचे ठिकाण, कधी कोणते सार्वजनिक ठिकाण, भांडी गोळा करणे, शिबिरात येण्याऱ्यांचे बुकिंग करणे, आले तर त्यांची वऱ्हाडी मंडळींसारखी देखभाल करणे ई. खूप आश्चर्य वाटायचे त्यांची अशा प्रकारची सेवा पाहून.

या सुरुवातीच्या गोष्टी आहेत. जेव्हा कार्य सफलतेच्या दिशेने पुढे पावले टाकते तेव्हा बाब वेगळी असते. सुरुवातीला तर खूप मोठ्या अडचणी होत्या. त्या अडचणींच्या दिवसांमध्ये कशा प्रकारे आपल्या घर-गृहस्थीच्या, व्यापार-धंद्याच्या जबाबदाऱ्या एकीकडे ठेवून, शिबिराची व्यवस्था करणे आणि इतक्या मैत्रीने या आलेल्या साधक-साधिकांची सेवा करणे, त्याच प्रमाणे यथाशक्ती त्यांच्या सर्व गरजांची पूर्तता करणे, १० दिवसांचे शिबिर समाप्त झाले की इथून-तिथून गोळा केलेली भांडी इ. परत करणे, जे लोक आले त्यांची तिकिटे बुक करून त्यांच्या परत जाण्याची व्यवस्था करणे. आश्चर्य वाटते की कसे या अपरिचित लोकांनी इतके मोठे काम केले. हे सर्व कसे झाले? आणि ठिक-ठिकाणी अशा स्थानांवर व्यवस्था करणे जी अनुकूल नसली तरी बिचारे व्यवस्थापक कशा प्रकारे दिवस-रात्र एक करून, किती मेहनतीने आणि सेवाभावाने कामात जुंपले जात होते. आणि अशा प्रकारे काम वाढत गेले, वाढत गेले.

हळू-हळू धर्माची स्थायी केंद्रे बनू लागली, इथेही आणि बाहेरही. म्हणायला तर सोपे आहे की धर्माचे स्थान बनले तर व्यवस्था करणाऱ्यांना तितकी अडचण नाही की आता जागा शोधा, त्यासाठी आवश्यक असणारे सामान शोधा. पण आता किती साऱ्या इतर जबाबदाऱ्या डोक्यावर येऊन पडल्या.

इतक्या मोठ्या स्थानाची व्यवस्था कशी करायची. इथे ही आवश्यकता आहे, तिथे ती..., नवीन काही निर्माण होत आहे त्यासाठी वेळ द्या, जुन्यांमधून काही तुटले-फुटले आहे त्यासाठी वेळ द्या. अरे! किती काम असते. आणि मग ज्या-ज्या लोकांना सांगितले की तुम्हाला प्रशिक्षणात साथ द्यायची आहे, सहायता करायची आहे तेव्हा किती निःस्वार्थ भावनेने आणि किती प्रेमाने कार्याला लागले. अरे! सर्वांच्या डोक्यावर आप-आपल्या जबाबदाऱ्या आहेत, सर्व गृहस्थ आहेत, आपल्या परिवारातील लोकांच्या भरण-पोषणाच्या जबाबदाऱ्या आहेत. काम-धंद्याच्या जबाबदाऱ्या आहेत, तरीही कसे कार्याला जुंपून गेले? शिबिरावर शिबिरे लावत चालले आहेत. अशा धर्म-स्थानांवर येऊन शिबिर लावले तर अडचणी कमी येतात पण ज्यांना अशा ठिकाणांवर शिबिर लावावे लागते– मी स्वत: ८-१० वर्षे या परिस्थितीमधून गेलो आहे, जिथे शिबिर लावणाऱ्याला आणि शिकवणाऱ्याला किती मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. अरे, व्यवस्थापकांना तर करावाच लागतो... मी चांगले जाणतो की हे इतक्या असुविधा असतानाही किती काम करतात. हे व्यवस्था करणारेच नाही तर धर्मसेवा करणारेही किती काम करतात. यांना पाहून एक सुखद आश्चर्य वाटते. शेवटी प्रशिक्षणाचे काम करणारांनाही काय मिळते? आर्थिक लाभ तर दूर, कोणी धन्यवाद द्यायलाही येत नाही. आवश्यकताही नाही धन्यवादाची. पण पाहतो की कधी-कधी तर बिचाऱ्यांना कठोर शब्दही ऐकून घ्यावे लागतात. व्यवस्था करणाराकडून काही चूक झाली तर जे ठीक काम केले ते तर केले, पण जी चूक झाली, सावधानतेने किंवा असावधानतेने, कळत किंवा नकळतपणे, समजून किंवा नासमजपणे चूक झाली की विविध प्रकारची टीका सुरु झाली. ज्याला पहावे तो टीका करतो. असे का झाले? असे व्हायला पाहिजे होते ना, यांना हे करायला येत नाही, त्यांना ते नाही... मान खाली घालून सर्व ऐकून घेतात ना.

मला माझ्या धर्म-पित्याकडून एक विरासत मिळाली की खूप कठोर होते ते अनुशासनात, खूप कठोर; आतमध्ये कितीही करुणा असली तरी, वरून इतके कठोर की एखाद्या हिऱ्याची कणीही काय कठोर असेल त्यांच्यापुढे. पण आत इतके मृदुल, इतके मृदुल. तर ही कठोरतेची गोष्ट आपल्या धर्म-पित्याकडून शिकलो आणि पाहतो की कधी कधी खूप कठोर शब्द वापरावे लागतात– आपल्या धर्म-पुत्रांप्रति, धर्म-कन्यांप्रति. अरे! हे बिचारे इतकी सेवा करतात आणि बदल्यात बोलणे ऐकून घ्यावे लागते तरीही मस्तक झुकवून हे सर्व सहन करतात. ते म्हणू शकतात– काय पडले आहे यात? असा गुरु आमच्या काय कामाचा? इतक्या कठोरतेने बोलतो. सोडा याला, आपण आपले घर-दार पाहूया, काय मिळेल आपल्याला? कशाला या जंजाळात पडायचे?

अरे! नाही, हे किती सहिष्णुतेने काम करतात, बदल्यात काही मिळत नाही ना, कोणाला काही आर्थिक लाभ मिळेल ही तर खूप दूरची गोष्ट झाली. कोणत्या पद-प्रशंसेचेही लोभी नाहीत. ना लाभ, ना सत्कार आणि हे देखील शिकतात की कोणी मस्तक झुकवले तर धर्मापुढेच झुकवले, माझ्यापुढे थोडे झुकवले. कोणी सन्मान करीत असेल तर धर्माचा करतो, माझा थोडे करतो. हे सारे काही कसे होत आहे? तर जसे मी वारंवार म्हणत असे– एक गोष्ट तर खूप स्पष्ट आहे की अरे, हा संसार!... भगवान बुद्धांसारखा व्यक्ती म्हणतो की मला याचा कोणता आदि (आरंभ) दिसत नाही. आदि (आरंभ) नाहीच तर कसा दिसेल? कित्येक कल्पांपासून, अरे! अगणित कल्पांपासून या संसाराचे संसरण होत आहे. कोणकोणत्या व्यक्ती केव्हा-केव्हा भेटल्या असतील. कोणकोणत्या व्यक्ती केव्हा-केव्हा एकत्र तपल्या असतील. कोणकोणत्या व्यक्ती केव्हा-केव्हा कोणत्या पुण्य-कार्यात बरोबर असतील. कोणी एखाद्या सेवा-कार्यात बरोबर राहिला असेल... आणि अशा प्रकारच्या घटना न जाणे कित्येक जन्मांमध्ये घडल्या असतील. तो सारा संबंध, पुण्य पारमितांचा एकत्र संग्रह करण्याचे जे इतके मोठे बळ आहे ते लोकांना खेचून घेते. ते केवळ धर्म शिकूनच थांबत नाहीत, केवळ काही शिबिरे करूनच थांबत नाहीत तर तन-मन-धनाने कामाला लागतात की कसे हे कार्य पुढे नेता येईल.

असे समजा की– एकाच शिबिरात कोणा व्यक्तीला इतका लाभ मिळाला की त्या लाभाच्या प्रभावाने त्याच्या मनात इतकी करुणा जागली की आता तर मला लोकसेवाच करायची आहे, हे काम कसे पसरेल याकडेच लक्ष द्यायचे आहे, असेही होऊ शकते. परंतु मला वाटते की ही एका जीवनाची किंवा एका शिबिराची गोष्ट नाही. न जाणे कितीतरी जन्मांमध्ये अशा प्रकारची कामे केली आहेत, धर्मसेवेची कामे केली आहेत, पुण्याची कामे केली आहेत, कुशल कार्ये केली आहेत आणि एकत्रितपणे केली आहेत तेव्हा तो सर्व जुना संग्रह जागतो आणि मग एकजुट होतो. लोक येतात साधना करतात, ज्यांच्या-ज्यांच्याजवळ जितकी-जितकी पारमी आहे, जितका पुण्य-संग्रह आहे तितक्या दृढतेने, तितक्या बळाने एकत्र जोडले जातात आणि काम असे होऊन जाते की कोणाला काही पत्ताही लागत नाही. अरे! इतके मोठे शिबिर सुरु होतच आहे की आणखी इतक्या लोकांचे बुकिंग पुन्हा आले. या सर्वांना ठेवणार कुठे? कशी सर्वांची व्यवस्था होईल? आणि जेव्हा शिबिर सुरू झाले तेव्हा विचारले, “झाली व्यवस्था?” – हो-हो सगळी झाली, सर्वांना जागा मिळाली. इतक्या लोकांचे भोजन तयार व्हायचे आहे, तेही वेळेवर. वेळेवरच इतक्या लोकांच्या गरजा पूर्ण करायच्या आहेत– पाणी, लाईट इत्यादीसहित वेवेगळ्या प्रकारच्या आवश्यक गोष्टी. हे सर्व कसे होते? यानेच मन दृढ होते की गोष्ट योग्यच आहे. अरे! काम तर धर्म करतो-करवितो भाऊ! आता धर्माच्या जागण्याची वेळ आली आहे...”

जसे गुरुजींनी म्हटले, “आता धर्माच्या जागण्याची वेळ आली आहे.” भले लाखो लोकांना विपश्यना मिळाली असेल. विश्वाच्या इतक्या मोठ्या जनसंख्येला पाहतो, लोकांच्या दुःखाला पाहतो-समजतो तेव्हा स्पष्टपणे माहित होते की या क्षेत्रात अजून खूप काम करणे बाकी आहे. विपश्यनेच्या शुद्ध विधी (पटिपत्ति) सहित भगवान बुद्धांचा शुद्ध उपदेश (परियत्ति) ही आवश्यक आहे. भारताचे खूप मोठे दुर्भाग्य होते की त्याने आपल्या इतक्या मोठ्या संपदेला पूर्णपणे गमावून टाकले. ...

भगवान बुद्धांनी कुठेही बुद्धिझम शिकवला नाही. त्यांची १५००० पृष्ठांची संपूर्ण वाणी भारताने गमावली. एकही पान आपल्या देशात शिल्लक राहिले नाही, दुर्भाग्याची गोष्ट झाली ना! पण प्रसन्नतेची गोष्ट ही की शेजारील देशांनी तिला सांभाळून ठेवले.

परियत्तिच्या उत्थानासाठी १९८५ मध्ये ‘विपश्यना विशोधन विन्यास’ ची स्थापना करण्यात आली आणि संपूर्ण त्रिपिटक, त्याच्या अर्थ-कथा आणि टीकांसहित बर्मी लिपितून देवनागरी लिपित बदलवून छापण्यात आले. परंतु हे सारे ग्रंथ पालि भाषेत आहेत. त्यामुळे एक काम तर त्याच्या अनुवादाचे आहे ज्यामधून काही-काही झाले आहे पण पुष्कळ सारे काम अजून बाकी आहे. याला पुढे नेण्यासाठी आपल्याला पालि भाषेच्या जाणकार साधकांची/पंडितांची संख्या वाढवावी लागेल. आपण पाहतो की इथे एक छोटीशी इंस्टिट्यूट बनली आहे आणि लोक इथे येवून पालि शिकू इच्छित आहेत. येतात तर बिचारे पालि शिकायला पण त्यांना व्यवस्थित जागा मिळत नाही. अधिक काळापर्यंत आरामशीर राहू शकत नाहीत. आणि पालि शिकतात तेव्हा ही देखील अपेक्षा केली जाते की थोडा वेळ पालि शिका, थोडा वेळ तुम्हाला सेवा करावी लागेल. तुम्ही इथे राहत आहात तर काहीतरी केलेच पाहिजे. कारण अजून इथे पर्याप्त सुविधा नाहीत. जेव्हा कधी मोठी इंस्टिट्यूट बनेल तेव्हा त्यात राहून ६ महिने काय १० वर्ष शिका, कोण मनाई करेल? मोठ्या इंस्टिट्यूटमध्ये पालि, संस्कृत, हिंदी सर्व शिकवले जाईल जेणेकरून हे बाहेरचे जे लोक येतात त्यांना या भाषांचे ज्ञान होईल की ज्यामुळे ते बुद्धांच्या शिकवणीला खोलवर समजून घेऊन तिला बाहेर पसरविण्यात आपले योगदान देऊ शकतील.

चौथी आवश्यक गोष्ट आहे प्रतीकांची– यांच्यापासून लोकांना जिज्ञासा, आश्वासन आणि प्रेरणा मिळत राहते. जी साधना केंद्रे बनली ती तर प्रतीके होतीच त्याचबरोबर ज्या पगोडाच्या कलाकृती बनल्या त्या आणखी आकर्षक प्रतीके बनल्या. यात सर्वात प्रमुख ग्लोबल विपस्सना पगोडा किंवा विश्व विपश्यना पगोडा तर धर्माचे प्रतीकच आहे. इथे केवळ धर्म-साधने संबंधी कार्यक्रमच होतात, इतर कोणती कर्मकांडे अजिबात होत नाहीत.

“पगोडा यासाठी बनविण्यात येऊ नये की त्यात कोणता संप्रदाय स्थापित व्हावा. धर्म-साधनेसाठीच पगोडा असावा. दुर्भाग्याने मागील २०००

वर्षांमध्ये या देशाने बुद्धांच्या जीवनाविषयी ज्या सत्यता आहेत त्यांना विस्मृतीत घालवले आहे. आणि फक्त विस्मृतीतच घालवले नाही तर आणखी बऱ्याचशा चुकीच्या गोष्टी त्यांच्यावर थोपवून दिल्या. मागच्या २००० वर्षांपासून त्याच गोष्टी ऐकून-ऐकून लोकांच्या मानस-पटलावर इतका जाड लेप लागला गेला आहे ज्याचे एक उदाहरण समोर आले. आता मागच्याच दिवसांमध्ये एक एपिसोड चालू होता. तो पाहून वाटते की कशा प्रकारे लोक अजूनपर्यंत भ्रमित झाले आहेत. आणि त्या भ्रम-भ्रांतींना अशा प्रकारचे एपिसोड आणखी बढ़ावा देतात. प्रश्न उठतो की लोकांना सत्यता कशी माहित होईल? एक तर हे की अशा प्रकारचा खूप मोठा ३००-३५० फूट ऊंच चैत्य बनला तर लोक यासाठी येतील की पाहू– इथे काय आहे? जिज्ञासेमुळेच येतील. येतील त्याला पाहायला आणि पाहतील की त्यात एक गैलरी आहे, एक दीर्घिका आहे ज्यात बुद्धांच्या जीवनाची, त्यांच्या शिकवणीची, त्यांच्या जीवनातील घटनांची आणि ऑडियो-विडियो इत्यादींच्या द्वारे विपश्यनेची महानता समजावली गेली आहे. या परिसरात फिरल्यानंतर त्यांना विपश्यनेची काहीना-काही माहिती होईलच. दिवसभरात जरी २०००-४००० लोकांनी ते पाहिले-ऐकले आणि त्यांच्यातून ५-१० लोकांना जरी ही गोष्ट समजली आणि त्यांच्या मनात प्रेरणा जागली–अरे! हा तर खूप चांगला मार्ग आहे... तर कल्याण होईल ना त्या सर्वांचे! अशा प्रकारे हळूहळू देशात खरी माहिती पसरत जाईल– मेडिटेशनकरीता, ध्यानाकरीता. या अर्थाने याचे खूप मोठे प्रयोजन होईल इथे. महाबोधि सोसायटीने खूप मोठी कृपा करून आम्हाला हे आश्वासन दिले की त्यांच्याकडे जे भगवान बुद्धांचे अस्थि अवशेष आहेत की जे खरे आहेत, त्यातील काही हिस्सा ते आम्हाला देतील. ते इथे गुंबजच्या मध्यभागी स्थापित होतील. श्रीलंकेच्या प्रधान मंत्र्यांनीही काही धातु पाठविले आहेत, तेही तिथे असतील. अशा प्रकारांनी जे काही आम्हाला प्राप्त होईल त्यांना वर स्थापित करण्यात येईल. (स्थापित झाले आहेत) आणि त्याच्या आजूबाजूला जे खूप जुने साधक आहेत, एक वेळ निश्चित होईल त्या वेळी फक्त जुने साधक त्यात बसून ध्यान करतील. त्यांचे जे तरंग आहेत, स्वतःच्या अनुभवाने जाणतो की किती तीव्र तरंग असतात, किती कल्याणकारी तरंग असतात. त्यांच्या सानिध्यात ध्यान इतके चांगले होते त्याचा लाभ होणारच. याशिवाय इतका मोठा हॉल (३३० फूट डायमीटर) चा, ज्यात सुमारे ८००० पेक्षा जास्त लोक एकत्र बसून ध्यान करु शकतील.

आम्हाला असे दिसत आहे की एक वेळ अशी येईल– जेव्हा ५-५, १०-१० हजार व्यक्ती तिथे बसतील, भले अर्धा तासच त्यांना आनापान दिले, (ते स्वीकार करतील तेव्हाच त्यांना देऊ.) आणि त्यापैकी १०-२०-५० व्यक्तींनाही योग्य प्रकारे साधना मिळाली तर किती लाभ होईल. इतरांच्या मनात हा भाव जागेल की भाऊ! ही तर खूप चांगली विद्या आहे, तेही १० दिवसांचे शिबिर करतील. करतील तर खूप चांगली गोष्ट, जीवनात त्याचा उपयोग करतील. त्याला कोणत्याही प्रकारे कर्मकांडाचे स्थान बनू दिले जाणार नाही, कोणत्याही प्रकारे संप्रदायाचे केंद्र बनू दिले जाणार नाही. ना कोणी इथे पुजारी बसेल, ना कोणी पंडित बसेल, ना कोणी पुरोहित बसेल, ना आणखी काही... ज्यांना भगवान बुद्धांच्या शरीर-धातुवर श्रद्धेची फुले अर्पण करायची आहेत, नमस्कार करायचा आहे त्यासाठी एखादे वेगळे स्थान असेल. हॉलच्या आतमध्ये कोणत्याही प्रकारचे कर्मकांड अजिबात होऊ दिले जाणार नाही की ज्यामुळे लोकांना माहित होईल की कधी कोणत्या काळी हे जे चैत्य बनले होते ते का बनले होते? त्यांचा काय उपयोग होत होता? हा भारताच्या लोकांकरीता आदर्श ठरेल.

**"सुखा सङ्घस्स सामग्गी"** जो संघ असतो– संघ केवळ भिक्षूंचा नसतो, केवळ भिक्षुणींचा नसतो. गृहस्थ पुरुषांचा, गृहस्थ स्त्रियांचाही संघ असतो. तपस्या करणाऱ्यांचा संघ एकत्र झाला तर खूप सुखदायी होते, आणि "समग्गानं तपो सुखो" – हे फक्त एकत्रच येऊ नयेत तर एकत्र येऊन तपस्या करोत, अरे! या सुखाचे काय मोजमाप?"...

याच्या व्यतिरिक्त पगोडाच्या आणखीही विशेषता असतील. पगोडाचे बाह्य रूप तर लोकांना आकर्षित करण्यासाठी असते. आतमध्ये खरोखरच बुद्ध कोण होते? त्यांच्या जीवनातील घटना, त्यांनी काय शिकवले? याविषयी ज्या भ्रांती आहेत त्या भ्रांतींना काढून टाकण्यासाठी त्या सर्व गोष्टी दर्शक-दीर्घिकेमध्ये दाखवल्या जातील. आजच्या वैज्ञानिक पद्धतीने दाखवल्या व ऐकवल्या जातील, चालत्या-फिरत्या स्वरूपांमध्ये दाखवल्या जातील ज्यामुळे लोक योग्य पद्धतीने समजू शकतील.

नुसत्या मोठ-मोठ्या इमारती उभारण्याने काही साध्य होणार नाही. मोठी इमारत कशासाठी बनवतात की ज्या व्यक्तीने इतकी मोठी गोष्ट शोधून काढली की जी विश्वातील कोणी दुसरा व्यक्ती करू शकला नाही. २६०० वर्षांपूर्वी या महान वैज्ञानिकाने शोध लावला की साऱ्या विश्वात कुठेच ठोसपणा नाही. There is no solidity in the entire material world or mental world, mere vibration-mere vibration. **"सब्बो पज्जलितो लोको, सब्बो लोको पकम्पितो।"** २६०० वर्षांपूर्वी कोणत्याही प्रयोगशाळेशिवाय, कोणत्याही उपकरणांशिवाय जाणून घेतले– आतील सत्याला पाहता-पाहता... आजचे वैज्ञानिक देखील हे म्हणू लागले आहेत की कोणताही ठोसपणा नाही. बुद्धांनी ही गोष्ट शोधून काय केले? कोणते कुतूहल पुरे नाही केले. ही गोष्ट शोधून काढून शरीराची संवेदना पाहण्यालायक बनवले की कुठेच ठोसपणा नाही. आत संवेदना चालू आहे, कसली संवेदना चालू आहे? तिला जाणले, तिला जाणून आपल्यात सुधारणा करणे सुरू केले. अरे! या व्यक्तीने इतकी मोठी विद्या शोधून काढली. लोकांचे कल्याण केले. आम्ही दुर्भाग्याने तिला गमावून टाकले. अशा व्यक्तीचे अवशेष, त्याचा सन्मान झाला पाहिजे ना... हा इतका मोठा पगोडा त्यांच्या अवशेषांचा सन्मान करण्यासाठी, बुद्धांचा सन्मान करण्यासाठी बनविण्यात आला आहे. आपल्या देशात एक असा महापुरुष झाला. अरे! विश्वातील मानव जातीच्या इतिहासातील एक असा महापुरुष ज्याने विश्वाच्या कल्याणासाठी इतकी मोठी विद्या शोधून काढली, त्याच्या अवशेषांचा आपण सन्मानच नाही करणार! इतर जण कसे सन्मान करतात. हजरत साहेबचा केस मस्जिदमध्ये ठेवतात, सन्मान करतात. बर्माचे लोक भगवान बुद्धांचा केस श्वेडेगोन पगोडामध्ये ठेवतात, सन्मान करतात. भगवान बुद्धांचा दात लंकामध्ये पगोडात ठेवतात, सन्मान करतात. आपल्यातही शुद्ध जागो, आपणही सन्मान करणे शिकूयात. सन्मान यासाठी करतात की त्यांच्यापासून आम्हाला इतके काही प्राप्त झाले, त्याचे उपकार मानतात. परंतु खरा सन्मान तर तो की जेव्हा आपण त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालू लागू. आणि इथे तर दोन्हीही कामे होतात. एकीकडे सन्मान होत आहे त्यांच्या अवशेषांचा आणि दुसरीकडे त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालण्यासाठी एकत्र जमत आहोत– (इथे धम्मपत्तन विपश्यना केंद्र आहे, जिथे पटिपत्ति शिकतात) आपल्या शांतीसाठी, इतरांच्या शांतीसाठी, आपल्या भल्यासाठी, इतरांच्या भल्यासाठी, आपले मंगल होण्यासाठी, इतरांचे मंगल होण्यासाठी खूप धर्म जागो, खूप धर्म जागो। सर्वांचे मंगल होवो! सर्वांचे कल्याण होवो!"

*(संकल्पांसंबंधी तिसरा भाग क्रमशः पुढील अंकात...)*

## पगोडा परिसरातील इतर कार्यक्रमांची संक्षिप्त माहिती

## आधुनिक मल्टी-मीडिया म्युझियम

आचार्य श्री गोयंकाजींची जन्म-शताब्दी तसेच 'शुद्ध धर्माचे २६००वे वर्ष' या प्रसंगांनिमित्त पगोडा-परिसरात नव-निर्मित एक अत्यंत आधुनिक "मल्टी-मीडिया म्युझियम" चे प्रायोगिक उद्घाटनही करण्यात आले. १८,००० वर्गफुटात ही प्रदर्शनी पसरली आहे.

यात भगवान बुद्धांचे जीवन, वैराग्य आणि संबोधि या विषयांवर सम्राट अशोकाची प्रबळ धर्म-भावना आणि धर्माच्या विश्व विस्ताराचे अनुपम योगदान तसेच म्यंमाच्या गुरु-शिष्य परंपरेच्या विशेष योगदानावर आणि आचार्य गोयंकाजींच्या प्रेरणादायी जीवनावर आकर्षक सामग्री प्रदर्शित केली गेली आहे.

आचार्य गोयंकाजींच्या कल्पनानुरूप या मल्टी-मीडिया प्रदर्शनीतून 'धर्म काय आहे' याला रोचक आणि सरळ शब्दांमध्ये प्रकाशित करण्याचा एक सुंदर प्रयत्न करण्यात आला आहे.

लवकरच याला सर्व पर्यटकांसाठी शनिवार, रविवार आणि सुट्टीच्या दिवसांमध्ये उघडण्यात येईल. आशा आहे की याला पाहिल्यानंतर मोठ्या संख्येने पर्यटक लघु आनापान सत्रामध्ये भाग घेतील आणि शुद्ध धर्माच्या मार्गावर चालण्यासाठी पहिले पाऊल उचलतील.

## ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, मुंबईमध्ये

**1. एक दिवसीय महाशिबिर (Mega Course) कार्यक्रमः**

**रविवारः 26 मे,** 2024 बुद्ध पौर्णिमा, **21 जुलै,** आषाढ-पौर्णिमा आणि **रविवार 29** सप्टेंबर, भाद्रपद-पौर्णिमा, व पूज्य गुरुजींच्या पुण्य-तिथि निमित्ताने **एक दिवसीय** महाशिबिर होतील.

**Online registration:** *http://oneday.globalpagoda.org/register* **Eail:** *guruji.centenary@globalpagoda.org* or *oneday@globalpagoda.org*

इतर कोणत्याही प्रकारच्या माहितीसाठी संपर्कः *info@globalpagoda.org* or *pr@globalpagoda.org*


## FORM IV

Statement about ownership and other particulars about newspaper '**Vipassana Sadak**' Monthly

| | | |
|---|---|---|
| Name of the Newsletter | : | Vipassana Sadhak |
| Language | : | Marathi |
| Frequency of publication | : | Monthly (every Purnima) |
| Place of publication | : | Vipassana Research Institute, Dhamma Giri, Igatpuri 422 403 |
| Name of the Printer, Publisher and Editor | : | Mr. Ram Pratap Yadav |
| Nationality | : | Indian |
| Place of printing | : | Apollo Printing Press, Nashik-422007. |
| Name of the proprietor | : | Vipassana Research Institute |
| Registered Office for the trust: | | Green House, Second Floor, Green Street, Fort, Mumbai 400 023 |

I, Ram Pratap Yadav, declare that the above-mentioned information is true to the best of my knowledge.

April 20, 2024. **Ram Pratap Yadav, Printer, Publisher and Editor**


### अतिरिक्त उत्तरदायित्व
### केंद्र-आचार्य

1. श्री संतोष कुमार व श्रीमती सीमा शर्मा – 'धम्म छवि', छिंदवाडा, मध्य प्रदेश, विपश्यना केंद्रांसाठी केंद्र-आचार्यांच्या रूपाने सेवा

### नवे उत्तरदायित्व
### आचार्य

1. श्रीमती वी. पद्मिनी, तिरुवन्नामलाई, धम्माचा प्रसार
2. श्री एम. आर. मुथुसामी, ऐरादे, तामिळनाडु, तमिळमध्ये धम्म साहित्याचा अनुवाद

### नवे उत्तरदायित्व
### वरिष्ठ स. आचार्य

1. डॉ. मेल्वीन चागास, गोवा
2. श्री कान्ताराव व श्रीमती रजिनी उप्पला, बैंगलोर
3. Mrs. Swarna Podimenike, Sri Lanka

### नव नियुक्ति
### सहायक आचार्य

1. श्री लक्ष्मण सिंह यादव, जयपुर, राजस्थान
2. श्री प्रसाद वीसमशेट्टी, हैदराबाद, तेलंगाना
3. श्री विजय भास्कर रेड्डी डोड्डा, हैदराबाद, तेलंगाना
4. कु. झरना बरुआ, पश्चिम बंगाल
5. श्री गोंदीमल्ल सत्यनारायण, नालगोंडा, तेलंगाना
6. कु. मनाली सभाया, राजकोट, गुजरात
7. श्री जवाहर पांडे, देवरिया, उत्तर प्रदेश
8. Mr. Kunnitee Putthipongpaiboon, Thailand

### क्षेत्रीय संयोजक बाल-शिबिर

1. श्री प्रीतम प्रधान, नेपाल (अतिरिक्त उत्तरदायित्व)

### बालशिबिर शिक्षक

1. श्री देवेंद्र सिंह, मिर्जापुर
2. श्री पवन सिंह, अयोध्या
3. कु. ममता बौद्ध, सीतापुर
4. श्रीमती राजकला पाटील, वाराणसी
5. कु. मंगलम, लखनऊ
6. श्री लोकेश जगदीश कसेरा, नवी मुंबई
7. श्री अनीश चौधरी, नवी मुंबई
8. श्रीमती दिशा चौधरी, नवी मुंबई
9. श्री अक्षय रविकांत चव्हाण, सातारा
10. श्री अंकुश वायदंडे, सातारा
11. श्री राहुल जाधव, सातारा
12. श्रीमती प्रीती राहुल शहा, सातारा
13. श्री अक्षय रविकांत चव्हाण, सातारा
14. श्री हर्षल बाळकृष्ण कदम, सातारा
15. श्रीमती कविता निळकंठ बागडे, कराड
16. श्री विजयानंद होगाडे, कराड
17. श्री निळकंठ बागडे, कराड
18. श्री अंकुर शर्मा, मुंबई
19. श्रीमती दिनश्री राजभोज, नाशिक
20. Mr. FUNG Chun HO Dennis, Hong Kong,
21. Ms. Wong Mei Ling, Hong Kong,
22. Mr. Kanu Fung, Hong Kong,
23. Ms. Lee Wing Tung, Eva, Hong Kong,
24. Mr. Yiu kwok hung, Hong kong,

## दोहे धर्माचे

सर्वांच्या कल्याणासाठी, स्तूप स्थापना होय।
जागे विश्व विपश्यना, जन-मन मंगल होय॥

शिळा शिळा रे जोडून, चैत्य तयार करी।
मिळे रे सुख, त्याखाली, बसूनच ध्यान करी॥

मंगलमय स्तूपातून, धर्म प्रकाशित होय।
सर्वांचे हित सुख साधे, भले विश्वाचे होय॥

पत्र पुष्प नैवेद्याने, उथळ च वंदन होय।
कर विपश्यना साधना, खरी वंदना होय॥

## दोहे धर्माचे

येत्या जात्या श्वासावर, राहो सतत च ध्यान।
सहज श्वासाची सजगता, साधन आनापान॥

पुन्हा पुन्हा रे भटकता, बघे दुःखी जहाँन।
श्वास आधारे राही, आत सुखाची खाण॥

छोटे जीवन मनुष्याचे, मिळे न वारंवार।
आपल्या सेवेन करी, पर-सेवा व्रत पार॥

समय येता आपणहून, जागे धर्म सकाळ।
तू जाणशी तूच कर्ता, गर्व करी सर्वकाळ॥


"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादकः राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनी: (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2567, चैत्र पौर्णिमा, 23 एप्रिल, 2024 वर्ष 8 अंक 1

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/RNP 286/2024-2026

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) (किरकोळ विक्री होत नाही)

**DATE OF PRINTING: APRIL 2024, DATE OF PUBLICATION: 23 APRIL, 2024**



If not delivered please return to:-

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
फोन : (02553) 244998, 243553, 244076, 244086, 244144, 244440
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org